# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १०/०२/२०२५ (सोमवार) संध्याकाळ**

---

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द कारवाई

**पोलीस स्टेशन पारशिवणी** :—दिनांक ०९/०२/२५ रोजी पारशिवणी पोलीस हददीत पेट्रलिंग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की सालई शिवार पेंच नदी पात्र येथे अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक होत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी घटनास्थळी जावुन पाहणी केली असता **सालई शिवार पेंच नदीच्या पात्रात महिद्रा ५८५ डीआय कंपनीचा विना नंबरचा ट्रक्टर सह आरोपी क्र १.** निकेश **पांडूरंगजी मिसार वय २९ वर्ष,बाबूरवाडा ता.पारशिवनी** हा मिळुन आला. आरोपी चालकाला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले तसेच रेतीची वाहतुक वाहन मालक आरोपी **संदीप यशवंतराव भागडकर वय ३७ वर्ष ,रा. बाबूरवाडा ता.पारशिवनी** यांच्या सांगण्यावरून करीत असल्याबाबत सांगितले. पोलीसांनी पंचासमक्ष **विना नंबर चा ट्रॅक्टर व ट्रॉली किं. ७,००,००० रू. व १ ब्रॅस रेती किं. ३,००० रू. व इतर साहित्य असा एकुण ७,०३,८०० रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**ट्रॅक्टर चालक** आरोपी नामे निकेश पांडूरंगजी मिसार, वय २९ वर्ष,बाबूरवाडा, ता. पारशिवनी आणि **ट्रॅक्टर मालक** संदीप यशवंतराव भागडकर वय ३७ वर्ष ,रा. बाबूरवाडा ता. पारशिवनी **यांच्या** विरूध्द **कलम ३०३(२)भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सह कलम ४,२१ खाण खनिज अधिनियमअन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर